MHST010023252022

दाखल तारीख – ०६.०८.२०२२
नोंदणी तारीख – १६.०८.२०२२
निकाल तारीख – २३.०७.२०२६
कालावधी – वर्ष – महिने – दिवस
०३ – ११ – १७

मोटार अपघात दावा न्यायाधिकरण, सातारा
(अध्यक्ष अरविंद शं. वाघमारे)
मोटार अपघात नुकसान भरपाई मागणी अर्ज क्र. २१५/२०२२

निशाणी क्र. ४२

१. **श्रीमती जोत्स्ना नितीन जाधव,**
वय वर्षे– ३०, धंदा– घरकाम.
२. **श्री. धर्मराज सदाशिव जाधव,**
वय वर्षे– ६०, धंदा– काही नाही.
३. **श्रीमती रुपाली धर्मराज जाधव,**
वय वर्षे– ५५, धंदा– घरकाम.
४. **पंकज धर्मराज जाधव,**
वय वर्षे– २०, धंदा– शिक्षण.
५. **कु.ओजस नितीन जाधव,**
वय वर्षे– १, धंदा– काही नाही.
सर्व रा. अनेवाडी, ता. जावली, जि. सातारा.

... अर्जदार

विरुध्द

१. **श्री. सेल्वराज रासाप्पन,**
वय सज्ञान, धंदा– व्यापार,
रा. १–२४,रासीपल्यम, पो.मोहनूर,
जि. नमक्कल, तामिळनाडू.
२. **विभागीय व्यवस्थापक,**
न्यू इंडिया ॲश्युरन्स कं.लि.
५१३, जीवनतारा, एल.आय.सी. बिल्डींग,
सदरबझार, सातारा.

... सामनेवाले

अर्जदारांतर्फे वकील – श्री. एस.डी. भोसले.
सामनेवाला क्र.१ – एकतर्फा.
सामनेवाला क्र.२ तर्फे वकील – सौ.ए.एस. जगताप.

न्यायनिर्णय
(जाहीर दिनांक २३ जुलै २०२६)

प्रस्तुत अर्ज अर्जदार यांनी मोटार वाहन कायदा १९९४ चे कलम १६६ अन्वये मयत नितीन धर्मराज जाधव, वय ३५ वर्षे यांच्या अपघाती मृत्यूबद्दल रुपये ३९,००,०००/– नुकसानभरपाई मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. अर्जदार क्र.१ ही मयताची पत्नी, अर्जदार क्र.२ व ३ हे आई–वडील, अर्जदार क्र.४ हे भाऊ आणि अर्जदार क्र.५ हा मुलगा आहे.

०२. सामनेवाला क्र.१ हे अपघातग्रस्त ट्रक क्र. टी.एन.२८ बी.बी. ५९८६ चे मालक व सामनेवाला क्र.२ ही विमा कंपनी आहे. (येथून पुढे सोईसाठी या वाहनाचा उल्लेख ''सदर ट्रक'' असा करण्यात येईल.)

०३. अर्जदारांचे थोडक्यात कथन असे आहे की, दिनांक १९.०४.२०२२ रोजी सकाळी ९.३० च्या सुमारास मयत नितीन धर्मराज जाधव हे मोटरसायकल क्र.एम.एच.११सी.यु.२८४२ वर पाठिमागे बसून (येथून पुढे सोईसाठी या वाहनाचा उल्लेख ''सदर मोटरसायकल'' असा करण्यात येईल.) सातारा–कराड रोडने निघाले होते. मौजे रामकृष्णनगर गावच्या हद्दीत सदर मोटरसायकल आली असता सामनेवाला क्र.१ यांच्या मालकीच्या सदर ट्रकचे चालक यांनी सदर ट्रक हयगयीने व निष्काळजीपणे राष्ट्रीय महामार्गावर रस्त्याच्या मधोमध उभा केला होता. तसेच ट्रक उभा केल्याबाबत कोणतीही पूर्व सूचना न दिल्याने, कोणताही इंडिकेटर न लावल्याने सदर ट्रकला सदर मोटरसायकलने धडक दिली. सदर अपघातात नितीन हे जखमी झाल्याने जागीच मयत झाले. अशाप्रकारे अपघात हा सदर ट्रक चालकाच्या निष्काळजीपणामुळे झालेला आहे.

०४. अपघातावेळी मयत नितीन यांचे वय ३५ वर्षे होते. मयत नितीन हे

श्रीकृष्ण बेकर्स येथे व्यवस्थापक म्हणून नोकरीस होते व त्यांना दरमहा रुपये १६,५००/– इतका पगार मिळत होता. अर्जदार क्र.१ ते ५ हे मयत नितीन यांच्या उत्पन्नावर अवलंबून होते. या सर्व कारणांसाठी त्यांनी रुपये ३९,००,०००/– नुकसान भरपाईची मागणी केली आहे.

०५. सामनेवाला क्र.१ यांचेवर नोटीसची बजावणी होऊनही ते प्रस्तुतकामी हजर झाले नाहीत. सबब, त्यांच्याविरुध्द प्रस्तुतचा अर्ज एकतर्फा चालणेबाबतचा आदेश पारीत करणेत आला.

०६. सामनेवाला क्र.२ सदर ट्रकची विमा कंपनी यांनी सदर प्रकरणामध्ये हजर होऊन त्यांची कैफियत निशाणी १४ अन्वये दाखल केली असून असे कथन केले आहे की, अपघात हा सदर ट्रक चालकाच्या चुकीमुळे झाला नसून सदर मोटरसायकल चालक यांच्या चुकीमुळे झालेला आहे. विकल्पेकरुन त्यांनी असे कथन केले आहे की, अपघातावेळी सदर ट्रक चालकाकडे वाहन चालविणेचा वैध परवाना नव्हता त्यामुळे सामनेवाला क्र.१ यांनी विमा पॉलीसीमधील अटी व शर्तींचा भंग केला आहे. सामनेवाला क्र.२ यांनी मयत नितीन यांचे वय, व्यवसाय, त्यांचे दरमहा असलेले उत्पन्न, अर्जदारांचे मयतावर असलेले अवलंबित्व इत्यादि गोष्टी अमान्य केलेल्या आहेत व अर्जदार नुकसान भरपाई मिळण्यास पात्र नाहीत असे नमुद करुन त्यांच्याविरुध्द क्लेम अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती केली आहे.

०७. माझे पूर्वाधिकारी यांनी अर्जदार व सामनेवाले यांच्या कथना आधारे निशाणी १५ अन्वये मुद्दे निश्चित केले आहेत. त्या वाद प्रश्नांवर त्यालगत माझे निष्कर्ष आणि त्यांची कारणमीमांसा खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

अ.क्र.	मुद्दे.	निष्कर्ष
१	मोटर अपघातात नितीन धर्मराज जाधव यांचा मृत्यू झाला, हे अर्जदार सिध्द करतात काय ?	होय.
२	ट्रक क्र. टी.एन.२८ बी.बी.५९८६ च्या चालकाच्या चुकीच्या कृत्यामुळे, निष्काळजीपणामुळे किंवा चुकीमुळे झालेल्या मोटर अपघातात नितीन धर्मराज जाधव यांचा मृत्यू झाला, हे अर्जदार सिध्द करतात काय ?	होय.
३	विमा पॉलीसीमधील अटी व शर्तींचा भंग झाल्याने नुकसान भरपाई देण्यास जबाबदार नसल्याचे सामनेवाला क्र.२ शाबीत करतात काय ?	नाही.
४	अर्जदार हे मागितलेल्या नुकसान भरपाईची रक्कम मिळण्यास पात्र आहेत काय ? असल्यास किती व कोणाकडून ?	होय. अंतिम आदेशाप्रमाणे.
५	आदेश काय ?	अंतिम आदेशाप्रमाणे.

कारणमीमांसा

०८. अर्जात केलेली विधाने सिद्ध करण्यासाठी अर्जदार यांच्यातर्फे खालीलप्रमाणे कागदोपत्री पुरावा सादर करणेत आला.

१	प्रथम वर्दि अहवाल.	नि. १८
२	घटनास्थळ पंचनामा.	नि. १९
३	मरणोत्तर पंचनामा.	नि. २०
४	शव विच्छेदन अहवाल.	नि. २१
५	आर.सी. बुक.	नि. २२
६	विमा पॉलीसी.	नि. २३
७	मयताचे आधारकार्ड.	नि. २५
८	दुकानाचे नोंदणी प्रमाणपत्र.	नि. ३१
९	पगार पावत्या. (एकूण ८)	नि. ३२

१०	पगाराचा दाखला.	नि. ३३

०९. अर्जदारांतर्फे साक्षीदार क्र.१ जोत्स्ना नितीन जाधव यांनी निशाणी १७ अन्वये पुराव्याचे शपथपत्र सादर केले आहे. तसेच साक्षीदार क्र.२ मुरली सुकुमारन विलेयावेटील यांचा जबाब निशाणी २८ अन्वये नोंदविला आहे.

१०. अर्जदार यांनी सादर केलेला पुरावा खोडून काढण्याकरीता सामनेवाला यांनी कोणताही साक्षीदार तपासला नाही. सामनेवाला क्र.२ यांनी निशाणी ४१ अन्वये गु.र.क्र. ६९/२०२२ मधील फेरिस्त दाखल केली.

११. अर्जदारांचे विधीज्ञ श्री. एस.डी. भोसले आणि सामनेवाला क्र.२ यांचे विधीज्ञ सौ.ए.एस. जगताप यांचा युक्तीवाद ऐकला.

१२. अर्जदार यांचेतर्फे दाखल करणेत आलेल्या खालीलप्रमाणे न्यायनिर्णयांचे अवलोकन करण्यात आले.

1) *Lalita Vs. Laxmansingh, LAWS (BOM)2021-3-65.*
2) *Gujrat State Road Trans.Corpn. Vs. Shardabai, LAWS (MPH)1995-8-19.*
3) *Khenyei Vs. New India Assurance Co., LAWS (SC)2015-5-26.*
4) *Pawan Kumar Vs. M/s Harkishan Das Mohan Lal, LAWS(SC)2014-1-62.*

१३. सामनेवाला क्र.२ यांचेतर्फे दाखल करणेत आलेल्या खालीलप्रमाणे न्यायनिर्णयांचे अवलोकन करण्यात आले.

1) *United India Insurance Co.Ltd. Vs. Janabai & Ors. 2003 ACJ 350.*
2) *Surender Kumar Arora and ors. Vs. Dr.Manoj Bisla & ors.,*

2012 ACJ 1305.

3) *Lachoo Ram & ors. Vs. Himachal Road Transport Corpn. 2015(1) ALL MR 483 S.C.*

मुद्दा क्रमांक १ ते ५ –

१४. सर्व मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्याने एकत्रीतपणे चर्चेला घेतले आहेत.

१५. अर्जदार क्र.१ जोत्स्ना नितीन जाधव यांनी स्वतःला शपथेवर निशाणी १७ अन्वये तपासून तोंडी पुरावा दिला आहे. त्यांच्या अर्जातील कथने व त्यांचा तोंडी पुरावा याचे एकत्रीतरित्या वाचन करता असे दिसून येते की, मयत नितीन धर्मराज जाधव हे सदर मोटरसायकलवरुन प्रवास करत असताना मौजे रामकृष्णनगर गावच्या हद्दीत सदर मोटरसायकल आली असता सामनेवाला क्र.१ यांच्या मालकीच्या सदर ट्रकचे चालक यांनी सदर ट्रक हयगयीने व निष्काळजीपणे राष्ट्रीय महामार्गावर रस्त्याच्या मधोमध उभा केला होता. तसेच ट्रक उभा केल्याबाबत कोणतीही पूर्व सूचना न दिल्याने, कोणताही इंडिकेटर न लावल्याने सदर ट्रकला सदर मोटरसायकलने धडक दिली. सदर अपघातात नितीन हे जखमी झाल्याने जागीच मयत झाले. अर्जदार यांनी पुराव्यात असेही कथन केले आहे की, प्रत्यक्षात अपघात हा सदर ट्रक चालकाने ट्रक राष्ट्रीय महामार्गावर उभा केल्याने त्याच्या चुकीनेच झाला. परंतु पोलीसांशी संगनमत करुन सदर मोटरसायकल चालकाविरुद्ध खोटा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अशाप्रकारे अपघात हा सदर ट्रक चालकाच्या निष्काळजीपणामुळे झालेला आहे.

१६. सदरचा पुरावा हा सामनेवाला क्र.२ यांनी उलटतपासाद्वारे आव्हानीत केला आहे. या साक्षीदाराने अपघात मोटरसायकल चालकाच्या चुकीमुळे झाला या सूचनावजा प्रश्नास नकारार्थी उत्तर दिले आहे.

१७. सदर अपघाताची खबर हणमंत धनाजी लोहार यांनी दिली आहे. त्यांच्या तक्रारीवरुन पोलीसांनी सदर मोटरसायकल चालकाविरुध्द भारतीय दंड विधान संहिता कलम २७९, ३३७, ३३८, ३०४(अ) आणि मोटरवाहन कायदा कलम १८४ अन्वये गुन्हा दाखल केल्याचे दिसून येत आहे. तसेच पोलीसांनी दि. १९.०४.२०२२ रोजी अपघातस्थळास भेट देऊन निशाणी १९ कडील पंचनामा केलेला दिसून येत आहे.

१८. अर्जदाराने दाखल केलेल्या पोलीस कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, गुन्हा हा सदर मोटरसायकल चालकाविरुद्ध दाखल झाला आहे. गुन्ह्याची पहिली वर्दि (निशाणी क्र.१८) व घटनास्थळ पंचनामा (निशाणी १९) मधील मजकुराचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदरचा अपघात हा सदर ट्रक आणि सदर मोटरसायकल या दोन वाहनांमध्ये घडला. गुन्ह्याची पहिली वर्दि (निशाणी १८) मध्ये नमुद केल्याप्रमाणे सदर अपघातामध्ये मयत नितीन यांना गंभीर जखमा होऊन मृत्यू झाला आहे. तसेच मरणोत्तर पंचनामा (नि.२०) आणि शवविच्छेदन अहवाल (नि.२१) मध्ये मयत नितीन यांच्या डोक्यास मार लागून त्यांचा मृत्यू झाल्याचे दिसून येत आहे. वर चर्चा केल्याप्रमाणे सदर अपघातात झालेल्या जखमांमुळे मयत नितीन यांचा मृत्यू झाल्याचे सिद्ध होते.

१९. यातील अपघात नेमका कोणाच्या चुकीने झाला या मुद्यावर अर्जदारांच्या विधीज्ञांनी युक्तिवादादरम्यान ठामपणे असे कथन केले की, प्रस्तुतचा अपघात हा केवळ ट्रक चालकाच्या निष्काळजीपणामुळे झाला आहे. या कथनाच्या पुष्ठ्यर्थ त्यांनी निशाणी १८ कडील प्रथम वर्दि अहवाल आणि निशाणी १९ कडील घटनास्थळ पंचनामा व त्या सोबतच्या नकाशाकडे न्यायाधिकरणाचे लक्ष वेधले. या कागदपत्रांचे अवलोकन करता सदर ट्रकचा ॲक्सल तुटून ट्रक नादुरुस्त झाल्याने रस्त्याच्या मधोमध उभा असल्याचे दिसून येते.

२०. सामनेवाला क्र.२ यांच्या विधीज्ञांनी युक्तिवाद केला की, मयत हा मोटरसायकलवर मागे बसलेला होता व सदरची मोटरसायकल ही चंद्रकांत शंकर फरांदे हे चालवित होते. सदर मोटरसायकलने ट्रकला धडक दिल्याने मयत हा खाली पडल्याने जखमी होऊन त्याचा मृत्यू झाला. त्यामुळे अपघातात मोटरसायकल चालकाचाही निष्काळजीपणा होता. अपघाताचा गुन्हाही मोटरसायकल चालकावरच दाखल करण्यात आला आहे. अर्जदारांनी सदर मोटरसायकलच्या चालकास व विमा कंपनीस प्रस्तुतकामी पक्षकार म्हणून सामिल केले नाही. त्यांनी युक्तीवादात पुढे असेही कथन केले की, न्यायाधिकरण नुकसान भरपाई देण्याच्या निर्णयास आल्यास न्यायाधिकरणाने अपघातात सदर ट्रक व मोटरसायकल चालकाचा संयुक्त निष्काळजीपणा ५०:५० टक्के इतका गृहित धरावा.

२१. अर्जदारांच्या विधीज्ञांनी पुढे असा युक्तीवाद केला की, अपघातावेळी सदरचा ट्रक रस्त्याच्या मधोमध नादुरुस्त स्थितीत उभा असल्याने अपघात केवळ ट्रक चालकाच्या निष्काळजीपणामुळे झाला आहे. ज्या प्रकरणांमध्ये सर्व दोषी वाहनांचे मालक/विमा कंपन्या एकत्रितपणे आणि वैयक्तिकरित्या जबाबदार असतात अशा प्रकरणांमध्ये पिडीत व्यक्ती कोणत्याही एका वाहनाकडून १००% नुकसानभरपाईची मागणी करू शकते. या तत्वानुसार अर्जदारांनी सदर ट्रकचे मालक व विमा कंपनीकडून नुकसान भरपाईची मागणी केली असल्याने ती योग्य व न्यायोचित आहे.

२२. निशाणी १९ कडील घटनास्थळ पंचनाम्याचे अवलोकन करता त्यामध्ये ट्रकचा ॲक्सल तुटल्याने ट्रक नादुरुस्त स्थितीत कराड बाजुकडे तोंड करुन रस्त्यावर उभा असल्याचे नमुद आहे. सदर घटनास्थळ पंचनाम्यासोबतच्या नकाशाचे अवलोकन करता त्यामध्ये अपघातातील ट्रक हा रस्त्याच्या मधोमध

---9

उभा असल्याचे दिसून येते. मोटर अपघात दावा प्राधिकरणात नुकसानभरपाई मिळवण्यासाठी अपघाताचा पुरावा फौजदारी खटल्यासारखा १००% संशयातीत सिद्ध करण्याची गरज नसते. संभाव्यतेच्या आधारावर (Preponderance of Probabilities) अपघात घडल्याचे व निष्काळजीपणा असल्याचे स्पष्ट होत असल्यास नुकसानभरपाई मंजूर केली पाहिजे. या तत्वानुसार सदर प्रकरणामध्ये सदर ट्रक चालकाने ट्रक काळजीपूर्वक उभा करणे अभिप्रेत होते. जर सदर ट्रक चालकाने आपली जबाबदारी व्यवस्थीतरित्या पार पाडली असती तर अपघाताची बाब टळू शकली असती. येथे हे नमुद करणे आवश्यक वाटते की, युक्तीवादा दरम्यान सामनेवाला क्र.२ च्या विधीज्ञांनी सदर ट्रक व मोटरसायकल चालकाचा संयुक्त निष्काळजीपणा गृहित धरावा असे कथन केले आहे. परंतु, वरीलप्रमाणे विवेचन विचारात घेता अपघातात सदर ट्रक चालकाची चूक असल्याचे दिसून येते.

२३. प्रस्तुतचा अपघात मयत नितीन प्रवास करत असलेल्या मोटरसायकल चालकाच्या संयुक्त निष्काळजीपणामुळे झाला असे गृहित धरले तरी अर्जदारांतर्फे दाखल करणेत आलेल्या वर नमुद अ.क्र.३ कडील ***Khenyei Vs. New India Assurance Co.*** या न्यायनिर्णयातील मार्गदर्शनाप्रमाणे अर्जदार हे अपघातात समाविष्ट असलेल्या वाहनांपैकी कोणत्याही एका वाहनाच्या मालक व विमा कंपनीकडून १०० टक्के नुकसानभरपाई मागू शकतात.

२४. आता असा प्रश्न उपस्थित होतो की, अर्जदार हे मागितलेली नुकसान भरपाई मिळण्यास पात्र आहेत काय? असल्यास किती व कोणाकडून? अर्जदारांच्या म्हणण्याप्रमाणे मयत नितीन यांचे वय अपघातावेळी ३५ वर्षे होते. हे दाखविण्यासाठी त्यांनी निशाणी २५ अन्वये मयत नितीन यांचे आधारकार्डाची प्रत दाखल केली आहे. त्यामध्ये त्यांची जन्म तारीख १२.०८.१९८९ अशी नमुद आहे. त्यामुळे अपघातावेळी त्यांचे वय वर्षे ३२ पूर्ण होते हे लक्षात घ्यावे लागते.

माननीय सर्वोच्च न्यायालयाचे ***सरला वर्मा वि।। दिल्ली ट्रान्स्पोर्ट कं. व इतर, २००९(२) टीएसी ६७७*** या न्यायनिर्णयातील निरिक्षणानुसार वयोगट ३१ ते ३५ साठी "१६'' हा गुणांक या प्रकरणामध्ये लागू होतो.

२५. अर्जदार यांनी असे कथन केले आहे की, मयत नितीन हे मुरली सुकुमारन विलेयावेटील यांच्या श्रीकृष्ण बेकर्स येथे व्यवस्थापक म्हणून नोकरीस होते. मयत नितीन यांना दरमहा रुपये १६,५००/– इतका पगार मिळत होता. ही बाब सिध्द करण्यासाठी त्यांनी निशाणी २८ अन्वये श्रीकृष्ण बेकरीचे मालक मुरली सुकुमारन विलेयावेटील यांचा जबाब नोंदविला आहे. त्यांनी सरतपासात असे कथन केले आहे की, मयत नितीन धर्मराज जाधव हे त्यांच्या बेकरीमध्ये व्यवस्थापक या पदावर नोकरीस होते. ते त्यांना दरमहा रुपये १६,५००/– इतका पगार देत होते. या कथनांच्या पुष्ठ्यर्थ त्यांनी निशाणी ३१ अन्वये दुकानाचा परवाना, निशाणी ३२ अन्वये पगाराच्या पावत्या आणि निशाणी ३३ अन्वये नोकरीचा दाखला दाखल केला आहे. त्यानुसार अर्जदारांतर्फे साक्षीदार क्र.२ श्री. मुरली सुकुमारन विलेयावेटील यांच्या श्रीकृष्ण बेकरीमध्ये मयत नितीन हे नोकरीस होते असा निष्कर्ष निघतो. त्यांनी उलटतपासामध्ये मयत नितीन हे त्यांच्याकडे कामास होते व ते त्यांना दरमहा रुपये १६,५००/– पगार देत होते हे दाखविण्यासाठी कागदोपत्री पुरावा सोबत आणला नसल्याचे कबुल केले आहे. तथापी, मयत नितीन हे उदरनिर्वाहासाठी काही ना काही काम नक्कीच करत असणार. सामनेवाला यांच्या विधीज्ञांनीही युक्तीवादावेळी मयताचे काल्पनीक उत्पन्न दरमहा रुपये १५,०००/– गृहित धरणेस हरकत नसल्याचे कथन केले. वरीलप्रमाणे सर्व बाबी विचारात घेता मयत नितीन याचे काल्पनीक उत्पन्न दरमहा रुपये १५,०००/– इतके गृहित धरणे योग्य होईल.

२६. अर्जदार क्र.१ या पत्नी, २ व ३ हे आई–वडील, अर्जदार क्र.४ हे

भाऊ आणि अर्जदार क्र.५ हा मुलगा या नात्याने मयत नितीन यांच्यावर अवलंबून असल्याचे दिसून येते.

२७. वर चर्चा केल्याप्रमाणे अपघात समयी मयत नितीन यांचे वय ३२ वर्षे होते. त्यामुळे ***नॅशनल इंशुरंस कं.लि. विरुध्द प्रणय सेठी, २०१७ ए.सी.जे.२७००*** या माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या निकालपत्रातील निर्देशाप्रमाणे मयताचे भविष्यातील उत्पन्नाची वाढ ४० टक्के विचारात घ्यावी लागेल. तसेच मयताचे वयानुसार १६ चा गुणांक लागू होईल. मयतावर त्याची पत्नी, आई-वडील, भाऊ व मुलगा अवलंबून असल्याने वैयक्तीक खर्चाकरीता १/४ रक्कम वजा करावी लागेल. या विवेचनाच्या आधारे नुकसान भरपाईची गणना खालीलप्रमाणे केली आहे.

१.	मयताचे वार्षीक उत्पन्न १२ x १५,०००/-	रुपये १,८०,०००/-
२.	भविष्यातील उत्पन्नाची वाढ ४० टक्के. (रुपये १,८०,०००+ ७२,०००)	रुपये २,५२,०००/-
३.	मयतावर अवलंबून असणाऱ्यांची संख्या ४ असल्यामुळे मयताचा वैयक्तीक खर्च १/४ वजा करता मिळणारे उत्पन्न, वजा करता अर्जदाराची अवलंबीत्वाची रक्कम.	रुपये २,५२,०००/- वजा रु.६३,०००/- (रु.१,८९,०००/-)
४.	मयताचे वयाचा विचार करता उत्पन्नाची हानी निश्चित करण्यासाठी गुणांक १५ ने गुणून उत्पन्नाची अवलंबित्वाची रक्कम. (रुपये १,८९,०००/-x १६)	रु. ३०,२४,०००/-
५.	लॉस ऑफ कंसोरटिअम (सहवासाचे नुकसान) (दि.३१.१०.२०१७ पासून रुपये ४०,०००/- वर दर ३ वर्षांनी १० टक्के वाढीसह येणारी र.रु. ४४,००० x ५)	रुपये २,२०,०००/-
६.	लॉस ऑफ इस्टेट (संपत्तीचे नुकसान) व अंत्यविधी या करीता खर्च एकत्रीतपणे रुपये ३०,०००/-. (दि.३१.१०.२०१७ पासून रुपये ३०,०००/- वर दर ३ वर्षांनी १० टक्के वाढीसह येणारी र.रु. ३३,०००/-)	रुपये ३३,०००/-
	नुकसान भरपाईची अंतिम रक्कम. (अ.क्र.४ ते ६)	**रु.३२,७७,०००/-**

२८. सामनेवाला क्र.१ यांनी सामनेवाला क्र.२ यांचेकडे सदर ट्रकचा विमा दि.१९.१२.२०२१ ते १८.१२.२०२२ या कालावधीकरीता उतरविला होता. अपघात दि.१९.४.२०२२ रोजी झाला असल्याने अपघात समयी विमा पॉलीसी वैध होती. अर्जदारांना मयत नितीन यांच्या अपघाती मृत्यूबाबत वरीलप्रमाणे विविध तपशिलांसाठी नुकसान भरपाई देण्याची जबाबदारी सामनेवाला क्र.१ व २ यांची संयुक्त व व्यक्तीशः आहे. अर्जदार हे वरील रकमेवर अर्ज दाखल तारखेपासून द.सा.द.शे. ८ टक्के दराने व्याज मिळण्यास पात्र आहेत. करीता मुद्दा क्र. १, २ व ४ चे उत्तर "होय" आणि मुद्दा क्र. ३ चे उत्तर "नाही" असे नोंदवून खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

१. अर्जदार यांचा मोटार अपघात नुकसान भरपाई अर्ज खर्चासह अंशतः मंजुर करणेत येतो.

२. सामनेवाला क्र.१ व २ हे वैयक्तीक व संयुक्तीकरित्या अर्जदार क्र.१ ते ५ यांना अंतरीम नुकसानभरपाईच्या रकमेसह एकूण नुकसान भरपाई रक्कम रुपये ३२,७७,०००/- (रक्कम रुपये बत्तीस लाख सत्त्याहत्तर हजार फक्त) व त्यावर अर्ज दाखल तारखेपासून संपूर्ण रक्कम वसुल होईपर्यंत द.सा.द.शे. ८ टक्के व्याज दराने देण्यास बांधील आहेत.

३. सामनेवाला क्र.१ ते २ यांनी अर्जदारांना देण्याकरीता वरील रक्कम वाहन अपघात दावा न्यायाधिकरण यांचे बँक खाते क्रमांक ४०८२७५२६३३३, IFSC कोड क्र. SBIN-0010713 मध्ये जमा करावी.

४. नुकसान भरपाईच्या व्याजासह येणाऱ्या एकूण रकमेपैकी अर्जदार क्र.१ यांना ५०% रक्कम, अर्जदार क्र.५ यांना २० टक्के रक्कम आणि अर्जदार क्र.२

ते ४ यांना प्रत्येकी १०% रक्कम देण्यात यावी.

५. अर्जदार क्र.१ यांचे हिश्श्यास येणाऱ्या रकमे पैकी ५० टक्के रक्कम त्यांच्या पसंतीच्या कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेत तीन वर्षांच्या मुदत ठेवीने ठेवणेत यावी. मात्र ठेवीवरील मासिक अथवा त्रैमासिक व्याज त्यांच्या इच्छेनुसार घेण्याची त्यांना मुभा राहील. अर्जदार क्र.१ यांच्या हिश्श्याची उर्वरीत रक्कम त्यांच्या बँक खात्यात ऑन लाईन पध्दतीने वर्ग करण्यात यावी.

६. अर्जदार क्र.२ ते ४ यांच्या हिश्श्याची व्याजासह येणारी रक्कम त्यांच्या बँक खात्यात ऑन लाईन पध्दतीने वर्ग करण्यात यावी.

७. अर्जदार क्र.५ याच्या हिश्श्यास व्याजासह येणारी संपूर्ण रक्कम अर्जदार क्र.१ यांच्या पसंतीच्या कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेत अर्जदार क्र.५ याच्या नावे तो सज्ञान होईपर्यंत मुदत ठेवीने ठेवणेत यावी. मात्र ठेवीवरील मासिक अथवा त्रैमासिक व्याज इच्छेनुसार घेण्याची मुभा अर्जदार क्र.१ यांना राहील. अर्जदार क्र.५ ही अज्ञान असल्याने अ.पा.क. म्हणून अर्जदार क्र.१ जोत्स्ना नितीन जाधव यांचे नांव लावण्यात यावे.

८. अर्जदारांनी नुकसान भरपाईची रक्कम वर्ग करण्यासाठी त्यांचा बचत खाते क्रमांक, पॅन क्रमांक आणि आधार क्रमांक सादर करावा.

९. मुदतीपूर्वी सदर रक्कम या न्यायाधिकरणाचे पूर्व परवानगीशिवाय परत करणेत येवू नये.

१०. अर्जदार यांनी अदा केलेले न्यायीक शुल्क कमी असल्यास, कमी असलेले न्यायीक शुल्क अर्जदार यांनी १५ दिवसांत अदा केल्यानंतर आदेश अंमलात येईल. न्यायीक शुल्क देण्यास विलंब झाल्यास आदेशाच्या तारखेपासून

न्यायीक शुल्काची रक्कम अदा करे पर्यंतच्या कालावधीत नुकसान भरपाईच्या रकमेवर व्याज मिळण्यास अर्जदार पात्र राहणार नाहीत.

११. येणेप्रमाणे अंतिम हुकुमनामा करणेत यावा.

ARVIND WAGHMARE

Digitally signed by ARVIND WAGHMARE
Date: 2026.07.23 18:02:56 +0530

(अरविंद शं. वाघमारे)

दि. २३ जुलै २०२६ अध्यक्ष, मोटार अपघात दावा न्यायाधिकरण,
सातारा.